# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 19 January 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १९ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

काँग्रेस पक्ष विकसित भारत जी राम जी योजनेबद्दल जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केला. ते आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. या कायद्यानुसार ग्रामीण भागातल्या प्रत्येक कुटुंबाला किमान १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली असल्याचं ते म्हणाले,

**बाईट – कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान**

मनरेगा अंतर्गत १० कोटी मालमत्ता निर्माण करण्यात आल्या असून, त्यापैकी साडे आठ कोटी मालमत्ता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली निर्माण करण्यात आल्याची माहिती चौहान यांनी दिली. मोदी सरकारच्या काळात २५ कोटी लोकांना गरिबीतून मुक्त करण्यात आल्याचंही त्यांनी नमूद केलं.

****

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल – एनडीआरएफचा स्थापना दिवस आज साजरा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त या दलाच्या व्यावसायिकता, समर्पण आणि आपत्ती प्रतिसादातील धैर्याचं कौतुक केलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील एनडीआरएफला शुभेच्छा दिल्या आहेत. आपत्तीदरम्यान एनडीआरएफ हा देशाचा आधारस्तंभ असून, आपत्ती-प्रतिरोधक राष्ट्र निर्माण करण्याच्या सरकारच्या संकल्पाला साकार करण्यात हा प्रतिसाद दल महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

लखनौ इथं उत्तर प्रदेश विधानसभेत आजपासून ८६व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेला सुरुवात होत आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला उद्घाटन सत्राला संबोधित करणार आहेत. या परिषदेत देशभरातल्या विधानसभांचे अध्यक्ष आणि विधानपरिषदांचे सभापती सहभागी होत आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेदरम्यान कायदेनिर्मिती प्रक्रिया, संसदीय कार्यपद्धती, सभागृहाचं कामकाज सुरळीत चालवण्याच्या पद्धती, या मुद्द्यांवर सखोल चर्चा होणार आहे. नागरिक-केंद्री कायदा प्रक्रियांसाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर, दक्षता वाढवून लोकशाही शासनव्यवस्था अधिक बळकट करणं, क्षमतानिर्मिती आणि जनतेप्रती उत्तरदायित्व वाढवण्याच्या दृष्टीनेही या संमेलनात विचारमंथन अपेक्षित आहे.

****

स्वित्झर्लंडमधल्या दावोस इथं आजपासून जागतिक आर्थिक मंचाच्या ५६व्या वार्षिक संमेलनाला सुरुवात होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या परिषदेत सहभागी होत आहेत. जागतिक नेते, उद्योगसमूह, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी संवाद साधत महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी संकल्पना आणि संधी मांडण्याची ही महत्त्वाची संधी असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले असून, यंदा त्याहून अधिक गुंतवणूक आणण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे.

****

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येतील. दुपारी दोन ते चार वाजेपर्यंत अर्ज भरता येतील असं पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी के लक्ष्मण यांनी सांगितलं. दुपारी चार ते पाच या दरम्यान अर्जांची छाननी होईल. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील, आणि अध्यक्षपदासाठी २० जानेवारीला मतदान होणार आहे.

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेचे आमदार संदीप जोशी यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्तीचा निर्णय जाहीर केला आहे. सध्याची राजकीय संस्कृती, पक्षांतर आणि निष्ठावान कार्यकर्त्यांवरील अन्यायाबाबत त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली. १३ मे रोजी आमदारकीची मुदत पूर्ण झाल्यानंतर कोणतेही पद स्वीकारणार नसल्याचं त्यांनी जाहीर केलं. संपूर्ण भूमिका आणि निर्णयाचं कारण स्पष्ट करणारं भावनिक पत्र त्यांनी प्रसारित केलं.

****

एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं यंदाच्या जेईई मुख्य सत्र- १ या परीक्षेसाठीची प्रवेशपत्रकं जारी केली आहेत. या महिन्याच्या २१ ते २४ तारखेदरम्यान बी.ई. अथवा बी.टेकच्या पेपर १ साठी बसणाऱ्या उमेदवारांना एनटीएच्या अधिकृत वेबसाइट वर जाऊन प्रवेशपत्र डाउनलोड करता येणार आहे.

****

नाशिक जिल्ह्यात मालेगाव-मनमाड महामार्गावर आज पहाटे तीन वाजता झालेल्या अपघातात चार जण ठार, दोन जण गंभीर जखमी झाले तर वीस हून अधिक प्रवासी किरकोळ जखमी झाले. वर्हाणे गावाजवळ पुण्याहून मालेगावला जाणारी खाजगी बस समोरुन येणार्या पिकअपवर आदळल्यानं हा अपघात झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बीड जिल्ह्यात ग्लोबल विकास ट्रस्ट आणि सनफार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने परळी, अंबाजोगाई आणि धारूर तीन तालुक्यांतल्या नद्यांचं पुनरुज्जीवन करण्यात येत आहे. राक्षसवाडी इथून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत जिल्ह्यातल्या पापनाशी, गुणवरा, सरस्वती आणि वान या चार प्रमुख नद्यांच्या खोलीकरणाचं आणि रुंदीकरणाचं जवळपास १०३ किलोमीटर अंतराचं काम यावर्षी हाती घेण्यात आल्याची  माहिती ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी यांनी दिली. येत्या काही महिन्यांत हे काम पूर्ण झाल्यानंतर परिसराचा कायापालट होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

****